# परिपत्रक ३३६ १३/०३/२२००८

विषय :- विधान सभा व विधान परिषद प्रश्न/लक्षवेधी सुचना/
आश्वासने यांचा जलद निपटारा

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, विधान सभा व विधान परिषद यांचेकडून तारांकीत, अतारांकीत प्रश्न, लक्षवेधी सुचना व आश्वासने इत्यादीबाबत माहिती तात्काळ फॅक्सव्दारे व समक्ष मागविली जाते. वरीलप्रमाणे प्रश्नांची माहिती विभागीय कार्यालयाकडून वेळेमध्ये उपलब्ध होत नाही. या कार्यालयातील संबंधीत शाखेकडून दूरध्वनीव्दारे सुचना देऊन देखील माहिती मिळणेबाबत विभागीय कार्यालयाकडून आवश्यक तो प्रतिसाद मिळत नाही.

असेही निदर्शनास आले आहे की, ज्या कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या टेबलशी संबंधीत माहिती असते त्या संबंधीत व्यक्ती कार्यालयीन वेळ संपताच कार्यालय सोडून निघून जातात व तारांकित प्रश्नाच्या माहितीबाबत प्रश्न व उपप्रश्न, प्रश्नांचे अनुषंगाने पुरवणी टिपणी काय आहेत याची दखलसुध्दा घेत नाहीत. माहिती परिपूर्ण आहे की, अपूर्ण आहे याचीही शहानिशा करीत नाहीत व कार्यालय सोडून निघून जातात त्यामुळे या कार्यालयास शासनास माहिती तात्काळ सादर करता येत नाही ही बाब अतिशय गंभीर असून कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही.

याशिवाय संबंधीत अधिकाऱ्यांनी शासनास माहिती सादर होईपर्यन्त त्यासंबंधी काही उलट प्रश्न आहेत काय ? हयाचा पाठपुरावा मुख्यालयात करणे अत्यावश्यक बंधनकारक आहे.

तसेच तारांकीत प्रश्नासंबंधी माहिती पाठविताना विभागीय अधिकारी सदरहू माहितीची निट शहानिशा न करता मुख्यालयाकडे पाठवून कार्यालयीन जबाबदारी झटक्ण्याचा प्रयत्न करतात असाही अनुभव आहे. त्यामुळे विधान सभा/ परिषदेस धर्मादाय आयुक्तांना उत्तर देताना अडचणी निर्माण होतात.

तरी यापुढे असे निदर्शनास आल्यास संबंधीत निरीक्षक/कर्मचारी/अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कडक कारवाई करण्यात येईल याची सवग संबंधीतांनी नोंद घ्यावी व या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

दिनांक १३/३/०८

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई